**नोटांच्या बंडलाना मारलेल्या पिना - काढणे**

भारतीय रिझर्व बँक
मध्यवर्ती कार्यालय
बँकिंग प्रचालन आणि विकास विभाग
सेंटर - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५

नोव्हेंबर ७, २००१
कार्तिक १६, १९२३ (शके)

डिबीओडी क्र. डीआयआर बीसी. ४२/१३.०३.००/२००१-०२

बँकिंग रेग्युलेशन्स अधिनियम, १९४९ च्या कलम ३५ए च्या अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, सार्वजनिक हितार्थ आवश्यक आणि तातडीने करणे आवश्यक असल्याबाबत समाधान झाल्याने भारतीय रिझर्व बँक या नंतर पुढे आणि त्वरित प्रभावाने आदेश देत आहे कि,

१. बँकानी नवीन/ पुनर्वितरणायोग्य/पुनर्वितरणास अयोग्य नोटाच्या बंडलाना पिना मारण्याचे बंद करावे आणि त्याऐवजी नोटांची बंडले पेपरबँडने सुरक्षीत करावीत.

२. बँकानी पुनर्वितरणयोग्य आणि पुनर्वितरणास अयोग्य अशा नोट वेगळ्या कराव्यात आणि जनतेला केवळ स्वच्छ नोटा वितरित कराव्यात. बँकानी खराब झालेल्या नोटा पिना न मारलेल्या स्थितीत करंसी चेस्ट्द्वारे इनवर्ड रिमिटन्सेस मध्ये भारतीय रिझर्व बँकेला सादर कराव्यात.

३. बँकानी बँकनोटांच्या वॉटरमार्क खिडकीवर कोणत्याही प्रकारचे लिखाण करणे बंद करावे.

**(के.एल.खेत्रपाल)**
**कार्यकारी संचालक**